CMYK PMFBY Leaflet - Maharastra October - 2020 Size : A4 Front

कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय भारत सरकार व महाराष्ट्र शासन द्वारा प्रायोजित

# प्रधानमंत्री पीक विमा योजना

## सुरक्षित शेतकरी ! देशाचा अभिमान !

HDFC ERGO
Take it easy!

### रब्बी हंगाम - 2020-21

नैसर्गिक आपत्ती, किटकांचा प्रादुर्भाव किंवा अचानक उद्धवणाऱ्या घटना यामुळे होणारे पिकाचे नुकसान /येणारे अपयश यासाठी शेतकऱ्यांना विम्याचे संरक्षण देणे आणि आर्थिक पाठबळ देणे हा प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा (पीएमएफबीवाय) उद्देश आहे.

अशा प्रकारे, योजनेद्वारे शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य अबाधित करणे आणि त्यांना नाविण्यपूर्ण व आधुनिक कृषि पद्धतीचा स्वीकार करण्यास प्रोत्साहन देऊन शेती व्यवसाय निरंतर सुरु राहील याची काळजी घेतली जाते.

## ह्या योजनेचा कोणाला फायदा होऊ शकतो



अधिसूचित विभागामध्ये अधिसूचित पिके घेणारे भागीदार शेतकरी आणि भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी यांच्यासह सर्व शेतकरी संरक्षणास पात्र आहेत. परंतु , शेतकऱ्यांना अधिसूचित/विमित पिकामध्ये विमायोग्य स्वारस्य असले पाहिजे . कर्जदार शेतकऱ्यांसह सर्व शेतकऱ्यासाठी हि योजना ऐच्छिक करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी अधिसूचित पिकासाठी कोणत्याही वित्तीय संस्थाकडून (सहकारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, वाणिज्य बँका, खाजगी बँका आपले वगैरे) कृषिकार्यासाठी हंगामी कर्ज घेतले आहे आणि जे अंतिम मुदतीच्या तारखेच्या ७ दिवस अगोदर योजनेतून बाहेर पडलेले नाहीत, असे शेतकरी त्यांच्या वित्तीय संस्थाद्वारे योजनेत नाव नोंदणी करण्यास पात्र असतील.

## कशाचा विमा काढण्यात येता

पिकाचे नुकसान होण्याची शक्यता असलेले पिकाचे खालील टप्पे ह्या योजनेत समाविष्ट

**सर्वसमावेश जोखीम विमा संरक्षण :** उभ्या पिकाला असलेल्या (पेरणी ते कापणीपर्यंत) अप्रतिबंधित जोखमीमुळे पिकाच्या होणाऱ्या नुकसानीसाठी सर्वसमावेश जोखीम विमा संरक्षण दिले जाते. राज्य सरकारद्वारे पिकाच्या प्रायोगिक कापणीद्वारे प्रत्यक्ष पिकाच्या अंदाज घेतला जातो.

**कापणीपश्चात नुकसान :** कापणीनंतर सुकविण्यासाठी स्थितीत /लहान गाठ्यामध्ये बांधलेल्या स्वरूपात पसरलेल्या पिकासाठी जास्तीत जास्त १४ दिवसासाठी गारपीट , चक्रीवादळ, वादळी पाऊस आणि अवकाळी पाऊस याविरुद्ध संरक्षण उपलब्ध आहे. बाधित शेतकऱ्याने आपत्तीनंतर ७२ तासांच्या आत विमा कंपनीच्या टोल फ्री क्रमांकावर थेट किंवा संबंधित बँक , स्थानिक सरकारी कृषी विभाग सरकारी /जिल्हा अधिकाऱ्यामार्फत दाव्यांनी माहिती द्यावी.

**स्थानिक आपत्ती :** अधिसूचित क्षेत्रातील एकट्या शेतकऱ्याने गारपीट , दरड कोसळणे , जलप्रलय , ढगफुटी आणि वीज कोसळण्यामुळे लागलेली नैसर्गिक आग यामुळे अधिसूचित विमित पिकाचे नुकसान /हानी पोहचल्यास , बाधित शेतकऱ्याने आपत्तीनंतर ७२ तासांच्या आत विमा कंपनीच्या टोल फ्री क्रमांकावर थेट किंवा संबंधित बँक , स्थानिक सरकारी कृषी विभाग सरकारी /जिल्हा अधिकाऱ्यामार्फत दाव्यांनी माहिती द्यावी.

## योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्याकडून आवश्यक बंधनकारक दस्तऐवज

- आधारकार्डची प्रत
- योग्य प्रकारे भरलेल्या प्रस्ताव पत्र
- ७/१२ / जमिनीचा ताबा सिद्ध करणारे प्रमाणपत्र
- लागू कंत्राटाचे प्रतिज्ञापत्र / भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी करार पत्र
- आयएफएससी क्रमांक आणि बँकेचा खाते क्रमांक असलेली बँकेची पासबुकाची प्रत किंवा रद्द केलेला धनादेश
- राज्य सरकार विहित पेरणी प्रमाणपत्र किंवा प्रस्तावित पिकाची पेरणी करण्याचा उद्दिष्टाचे स्वयं-घोषणापत्र

## संरक्षण आणि दाव्यासाठी पूर्वअटी

**विस्तुत प्रमाणातील आपत्ती (हंगामाच्या अखेरच्या उत्पन्नावर आधारित):** क्षेत्रांसंबंधी द्रुष्टीकोनानुसार दावे निकाली काढण्यात येतील. राज्य सरकारद्वारे अधिसूचित विमाक्षेत्र पातळीवरील प्रायोगिक पीक कापणीद्वारे प्रत्यक्ष उत्पन्नाचा अंदाज केला जातो आणि उंबरठा (थ्रेशहोल्ड) उत्पन्न आणि चालू हंगामातील प्रत्यक्ष उत्पन्न यातील फरकाद्वारे तूट निश्चित केली जाते.

**दाव्याचे पैसे खात्यावर जमा :** प्रतिकूल हंगामी परिस्थितीमुळे सामान्य उत्पन्नाच्या तुलनेत हंगामात प्रभावित पिकाचे अपेक्षित उत्पन्न ५०% पेक्षा कमी असेल तर अशा पिकांना ते लागू आहे . अधिसूचित विमाक्षेत्र मध्ये विविध प्रॉक्सी निर्देशकाद्वारे उदा. पावसाची माहिती , इतर हवामानासंबंधी माहिती सॅटेलाईटद्वारे प्राप्त छायाचित्रे वगैरे नुसार राज्य शासनाद्वारे ठराविक पिकासाठी किंवा पिकांच्या गटासाठी हि तरतूद लागू केली जाऊ शकते. सामान्य कापणीच्या वेळेच्या १५ दिवस अगोदर प्रतिकूल घटना घडल्यास लागू केली जाणार नाही. हि तरतूद लागू केल्यानंतर संभाव्य दाव्याच्या २५% रक्कम देय असेल जे अंतिम दाव्याच्या समायोजनाच्या अधीन असेल.

**कापणीनंतरचे नुकसान आणि स्थानिक आपत्ती :** उत्पादन हानीचे मुल्यांकन वैयक्तिक भूखंडाच्या आधारे करण्यात येईल. विमाधारक शेतकऱ्याने आपत्तीनंतर ७२ तासांच्या आत माहिती देण्याची आवश्यकता आहे. ह्या माहितीत सर्वे नंबर नुसार विमित पिकाचा तपशील आणि हेक्टर नुकसान यांचा समावेश असावा व पुराव्याचे कागदपत्र म्हणून योग्य प्रकारे भरलेले दावा प्रपत्र ७ दिवसाच्या आत सादर करावे.

CMYK PMFBY Leaflet - Maharastra October - 2020 Size : A4 Front

**अधिसूचित पिके, प्रीमियमचा दर आणि प्रधानमंत्री पिक विमा योजने अंतर्गत विम्याचे रक्कम यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.**

| पिके शेतकरी विमा हप्ता दर (टक्के) | शेतकरी विमा हप्ता दर (टक्के) | नोंदणीची शेवटची तारीख |
|---|---|---|
| ज्वारी जि., ज्वारी बा. | १.५०% | ३० नोव्हेंबर २०२० |
| गहू बा. हरभरा | १.५०% | १५ डिसेंबर २०२० |
| कांदा. | ५% | १५ डिसेंबर २०२० |
| उ. भात, उ. भुईमूग. | १.५०% | ३१ मार्च २०२१ |

**विमा संरक्षित रक्कम (रु./हेक्टर)**

| जिल्हा | उ. भात (तांदूळ) | उ. भुईमूग | गहू बा. | ज्वारी जि. | ज्वारी बा. | हरभरा | र. कांदा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रायगड | ५०,००० | ४०,००० | - | - | - | - | - |
| धुळे | - | ४०,००० | ३७,५०० | २५००० | - | ३५००० | ८०,००० |
| पुणे | - | ४०,००० | ३८००० | २५००० | ३०,००० | ३५००० | ८०,००० |
| औरंगाबाद | - | - | ३८००० | २८००० | ३०,००० | ३५००० | ८०,००० |
| हिंगोली | - | ४०,००० | ३८००० | २८००० | - | ३५००० | - |
| अकोला | - | ३८००० | ३५००० | - | - | २४००० | ७३००० |
| भंडारा | ५५१०० | - | ३१२५० | - | - | २५००० | - |

**शेतकरी विमा हप्ता रक्कम (रु./हेक्टर)**

| जिल्हा | उ. भात (तांदूळ) | उ. भुईमूग | गहू बा. | ज्वारी जि. | ज्वारी बा. | हरभरा | र. कांदा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रायगड | ७५० | ६०० | - | - | - | - | - |
| धुळे | - | ६०० | ५६२.५ | ३७५ | - | ५२५ | ४००० |
| पुणे | - | ६०० | ५७० | ३७५ | ४५० | ५२५ | ४००० |
| औरंगाबाद | - | - | ५७० | ४२० | ४५० | ५२५ | ४००० |
| हिंगोली | - | ६०० | ५७० | ४२० | - | ५२५ | - |
| अकोला | - | ५७० | ५२५ | - | - | ३६० | ३६५० |
| भंडारा | ८२६.५ | - | ४६८.७५ | - | - | ३७५ | - |

## योजने संबंधित अधिक माहितीसाठी टोल फ्री क्रमांक

# १८००२६६०७००

**वर संपर्क साधा.**

**बिगर कर्जदार शेतकऱ्याची नोंदणी :** बिगर कर्जदार शेतकरी आपल्या पिकाचा विमा जवळच्या वित्तीय संस्थेमार्फत घेऊ शकतात उदा. राष्ट्रीयकृत बँक, सहकारी बँका, प्राथमिक कृषी सहकारी संस्था (पीएसीएस), प्रादेशिक ग्रामीण बँका / विमा मध्यस्थ / आपले सरकार सेवा केंद्र (सीएससी) / वेबसाइट लिंकद्वारे स्वत: नोंदणी: **https://pmfby.gov.in/farmerLogin** करू शकता. ई-मेल : pmfby.Maharastra@hdfcergo.com

एचडीएफसी एर्गो जनरल इन्शूरन्स कंपनी लिमिटेड. आयआरडीएआय नोंदणी क्र.146. सीआयएन: **U66030MH2007PLC177117**. नोंदणीकृत व कॉर्पोरेट कार्यालय: 1ला मजला, एचडीएफसी हाऊस, 165-166, बॅकबे रिक्लेमेशन, एच्. टी. पारेख मार्ग, चर्चगेट, मुंबई-400 020. जोखमींचे घटक, नियम व अटी, यासंबंधी अधिक माहितीसाठी, कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी विक्रीची माहितीपुस्तिका /प्रॉस्पेक्टस पाचा. वर दर्शविलेला ट्रेड लोगो एचडीएफसी लिमिटेड आणि एर्गो इंटरनॅशनल एजी यांच्या मालकीचा आहे आणि कंपनीने त्याचा परवान्याच्या अंतर्गत उपयोग केला आहे. UIN: Pradhan Mantri Fasal Bima Yojana–IRDAN125P0003V01201617 | CSC – Pradhan Mantri Fasal Bima Yojana – HDFC-AG-P18-25-V01-17-18. **UID: 6432**

CMYK PMFBY Leaflet - Maharastra October - 2020 Size : A4 Back